# शपथ, स्पर्धांतून आरोग्य दिनाचा जागर

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने शहरातील विविध संस्था, हॉस्पिटलमधून आरोग्य दिनाचा जागर सुरू होता; तर या निमित्ताने स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

सह्याद्री हॉस्पिटलच्या वतीने समाजाच्या आरोग्यासाठी शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुण्याचे महापौर दत्तात्रय धनकवडे यांच्या उपस्थितीत आरोग्य दिनाची शपथ घेण्यात आली. या वेळी हॉस्पिटलचे संचालक प्रकाश तुळपुळे उपस्थित होते. स्वत:ची आणि परिसराची स्वच्छता राखेन. व्यसनापासून दूर राहीन. स्वत:च्या व कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेईन. नियमित व्यायाम करेन. नियमित सकस आहार घेईन. दर वर्षी प्रतिबंधात्मक तपासणी करून घेईन. डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करेन, अशी शपथ हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर्स, नर्सेस तसेच इतर कर्मचाऱ्यांनी घेतली.

सदानंद गोडसे



**जागतिक आरोग्यदिनाचे औचित्य साधून पुणे शहर पोलिसांची इंडस हेल्थ प्लसतर्फे मंगळवारी मोफत तपासणी करण्यात आली. आयुक्त सतीश माथूर, इंडसच्या संचालिका कांचन नाईकवाडी आदी या वेळी उपस्थित होते.**

**पालिकेच्या वतीने कार्यक्रम**

आरोग्य दिनाच्या निमित्ताने शेतापासून ते ताटापर्यंत या दिनाच्या संकल्पनेनुसार आरोग्य खाते व नागरवस्ती विकास योजना विभागाच्या वतीने सुरक्षित पौष्टीक शालेय पोषण आहाराचे आयोजन करण्यात आले होते. बचत गटातील महिलांसाठी गंजपेठेत कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी उपआरोग्य प्रमुख डॉ. अंजली साबणे, सहायक आरोग्य प्रमुख डॉ. संजीव वावरे, नागर वस्ती विकास योजना विभागाचे प्रकल्प संचालक हेमंत नाझीरकर यांनी उपस्थित गटाच्या महिलांना आहाराबाबत मार्गदर्शन केले.

## 'भारती'तर्फे स्पर्धा

भारतीय सार्वजनिक आरोग्य संघटनेच्या राज्य शाखेच्या वतीने आंतरवैद्यकीय महाविद्यालय सार्वजनिक आरोग्य प्रश्नमंजुषा घेण्यात येते. या वर्षी अंतिम स्पर्धा भारती विद्यापीठात घेण्यात आली. प्रश्नांची एक फेरी आरोग्य दिनाविषयी होती. मुलांनी स्वत: चित्र काढून अथवा इंटरनेटवरून माहिती संकलित करून त्याच्या आधारे पोस्टर तयार केले होते. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. विवेक सावजी, संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुभाष दोदवाड यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. अंतिम फेरीचे आयोजन विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रमुख डॉ. जयश्री गोठणकर यांनी केले.